**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ७१ दिनांक २१/०९/२०२३**

# अवैधरित्या तंबाखूजन्य पदार्थाची वाहतूक करणाऱ्या आरोपीस कासा पोलीस ठाणे यांचेकडून अटक

आगामी गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभुमीवर श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी यांना अवैध धंदयावर कारवाई करणे बाबत मार्गदर्शन करुन सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने दिनांक २०/०९/२०२३ रोजी १७.०० वाजता कासा पोलीस ठाणे हद्दित आंबोली बिट भागात पो.ना./९१८ प्रमोद धुम, पो.हवा/७१२ धांगडा, पो.ना./७११ लाडवी असे पेट्रोलींग करत असताना मोडगाव हळदपाडा गावचे हद्दीत संशयीत आयसर टेम्पो क्रमांक एमएच-४८-सी.बी. ५७०८ आढळून आला. सदर टेम्पोस थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने अधिसुचनाव्दारे वाहतुकीस व विक्रीस प्रतिबंध केलेला खालील वर्णनाचा प्रतिबंधीत पान मसाला (गुटखा) सदर टेम्पोतुन विक्री करण्यासाठी बेकायदेशीरपणे वाहतुक करुन घेवुन जात असताना मिळून आला.

१) ४,३६,८००/-रुपये किंमतीच हॉट पान मसाला एकुण २९१२ पॉकेट प्रत्येकी १५० रुपये किंमतीचा.
२) २,१८,४००/-रुपये किंमतीचे एच टू के तंबाखु एकुण २९१२ पॉकेट, प्रत्येकी ७५ रुपये किंमतीचा.
३) ५,५४,४००/-रुपये किंतीचे सनकी पान मसाला एकुण ३९६० पॉकेट प्रत्येकी अंदाजे १४० रुपये किंमतीचा.
४) ७,३९,२००/-रुपये पान मसाला एकुण ५२८० पॉकेट प्रत्येकी अंदाजे १४० रुपये किंमतीचा.
५) ७,००,०००/-रुपये किंमतीचा लाल रंगाचा आयसर टेंम्पो क्रमाक एम एच. ४८, सी. बी. ५७०८ जु.वा.किं.सु.

असा एकुण २६,४८,८००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर बाबत कासा पोलीस ठाणे येथे । १५०/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३२८,१८८,२७२,२७३,३४ सह अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नियम व नियमने २०११ चे कलम २६(२)(४),२७ (२)(ई),२३(१),३० २)(अे) सहवाचन मा.अन्न सुरक्षा आयुक्त महाराष्ट्र राज्य अधिसुचना अ.सु.म.अ./अधिसुचना/७९४/२०१८/७ दिनांक २०/०७/२०१८ व अधिसुचना क्र.अ.सु.मा. का./अधिसुचना /७९५ regulation 20.2,3,4 of food safety and standard (prohibition

and restrictions on sales) regulation 2011सहवाचन regulation no.3,1,7 of food safety and standards (food product standards and food additives) regulation 2011 शिक्षा कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून टेम्पोवरील चालक आरोपी सुशिल सिताराम साहनी वय ३५ वर्ष रा. मांडवीपाडा साईधाम चाळ काशिमिरा, मिरारोड पुर्व जिल्हा ठाणे, मुळ रा. घटोहो नवनंबर वाड ता. विध्यापती जि. समस्तीपुर, राज्य बिहार यास अटक करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढिल तपास पोउपनि/संदिप नांगरे, नेमणुक कासा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्री. शैलेश काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. नामदेव बंडगर, प्रभारी अधिकारी, कासा पोलीस ठाणे, पोउपनि/संदिप नागरे, पोना/९१८ प्रमोद महादु धुम, पोहवा/७१२ धांगडा, पोना/७११ लाडवी सर्व नेमणूक कासा पोलीस ठाणे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.